महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


**क्रमांक:- १४४२/समोवानि/२०१७/२४** **दिनांक:- २७ डिसेंबर, २०२१**

# -:प्रसिद्धीपत्रक:-

**विषय :- <u>सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१७ (जाहिरात क्रमांक -४८/२०१७)</u>**
**प्रतीक्षायादी वरील उमेदवारांच्या शिफारशीबाबत**

सहायक मोटार वाहन निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१७ (जाहिरात क्रमांक - ४८/२०१७) या पदाच्या प्रतीक्षायादी बाबत दाखल मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ६४७/२०२० मधील संकीर्ण अर्ज क्रमांक ४४३/२०२१ प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने प्रस्तुत पदाच्या प्रतीक्षायादीचा कालावधी दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२१ च्या पुढे सहा महिन्यांनी वाढवला आहे. त्याअनुषंगाने शासनाने दिनांक ०९ डिसेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार २५ उमेदवारांची शिफारस प्रस्तुत पदाच्या प्रतीक्षायादी मधून शासनास करण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत परीक्षेच्या प्रतीक्षायादी वरील उमेदवारांच्या शिफारशी त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता नियुक्तीपूर्वी शासन स्तरावरुन मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शासनाकडे करण्यात येत आहेत. सदर तपासणीत उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यास शासन स्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना किंवा अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी/ शिफारस कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**३.** अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.१ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दि.१८ ऑगस्ट, २०१६ व दि. ११ मार्च, २०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदीनुसार आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट-क पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांकास (६ मे, २०१९) किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील. तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

**४.** उमेदवारांच्या माहितीसाठी प्रतीक्षायादीतून शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**ठिकाण : मुंबई**

**उपसचिव (प.अ.-२)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**